ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**नॅक मानांकित 'A' श्रेणी**

## मानव्यविद्या आणि सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

### पदव्युत्तर पदवी (एम. ए.) शिक्षणक्रम



## 'क्षेत्रीय प्रकल्प' अभ्यासक्रम : कार्यपुस्तिका

### शैक्षणिक वर्ष : २०२३ - २०२४

ycmou.ac.in

## विद्यापीठ गीत

एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना |
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ॥ धृ ॥
ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ॥ १ ॥
नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ॥ २ ॥
हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जिथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ॥ ३ ॥

कुसुमाग्रज

---

**‘क्षेत्रीय प्रकल्प’ अभ्यासक्रम: कार्यपुस्तिका**

**संकल्पना व लेखन :**
नागार्जुन वाडेकर
सहयोगी प्राध्यापक
संचालक (प्र.), मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
ज्ञानगंगोत्री, गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक – ४२२ २२२

---

© २०२४, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२
प्रथम प्रकाशन : मार्च २०२४
प्रकाशन क्रमांक : २८९३
अक्षरजुळणी : श्री. गुलाब घाटाळ, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
प्रकाशक : कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२

## अनुक्रमणिका


१.० मुक्त विद्यापीठाचा परिचय

१.०.१ मुक्त विद्यापीठाची वैशिष्ट्ये

१.१ विद्याशाखेचा परिचय

१.१.१ विद्याशाखेची उद्दिष्टे

१.१.२ विद्याशाखेची ठळक वैशिष्ट्ये

१.१.३ उपलब्ध शिक्षणक्रम

१.२ क्षेत्रीय प्रकल्प अभ्यासक्रम (Field Project)

१.२.१ क्षेत्रीय प्रकल्प अभ्यासक्रमाची उद्दिष्टे (Course Objectives)

१.२.२ क्षेत्रीय प्रकल्प अभ्यासक्रमाची निष्पत्ती (Course Outcomes)

१.२.३ क्षेत्रीय प्रकल्पासाठी सूचना

१.३ क्षेत्रीय प्रकल्पाची मूल्यमापन पद्धती

## १.० मुक्त विद्यापीठाचा परिचय

'मुक्त विद्यापीठ' ही संकल्पना नवी असून जगभरात तिचा सर्वत्र स्वीकार झाला आहे. विविध कारणांमुळे अनेकांना शिक्षण अर्धवट सोडावे लागते. ग्रामीण भागांना शैक्षणिक सुविधांचा अभाव असल्यामुळे, तसेच नोकरी-व्यवसायामुळे पुढील शिक्षण घेण्याची इच्छा असूनही ज्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते त्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या ध्येयाने मुक्त विद्यापीठे कार्यरत झाली आहेत. सन १९६९ मध्ये जगातले पहिले मुक्त विद्यापीठ इंग्लंडमध्ये स्थापन झाले. त्या पाठोपाठ चीन, जपान, कॅनडा, थायलंड, श्रीलंका, पाकिस्तान, बांगलादेश अशा अनेक देशांमध्ये मुक्त विद्यापीठे स्थापन झाली असून विविध शिक्षणक्रमांच्या संधी समाजातील इच्छुकांना दिली जात आहेत. भारतात 1982 मध्ये हैद्राबाद (आंध्रप्रदेश) येथे पहिले मुक्त विद्यापीठ स्थापन झाले. सन १९८५ मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय पातळीवर 'इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ' दिल्ली येथे स्थापन केले. त्यानंतर राजस्थान, बिहार, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक, पश्चिम बंगाल, उत्तरप्रदेश, तामिळनाडू, छत्तीसगढ, आसाम, उत्तराखंड, ओडीसा, पंजाब, केरळ या राज्यांत मुक्त विद्यापीठे कार्यरत झाली आहेत.

महाराष्ट्राला सामाजिक, शैक्षणिक परिवर्तन घडवणाऱ्या विचारवंतांची परंपरा लाभलेली आहे. महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, स्वामी रामानंद तीर्थ यांनी अमूल्य योगदान दिले आहे. त्यांचा वारसा घेऊन खेड्यापाड्यापर्यंत उच्च शिक्षण पोहोचवण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातल्या इतर विद्यापीठांप्रमाणेच दि. १ जुलै १९८९ रोजी महाराष्ट्र शासन विधिमंडळाच्या क्रमांक XX (1989) अन्वये मुक्त विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. आधुनिक महाराष्ट्राचे जनक यशवंतराव चव्हाण यांचे नाव या विद्यापीठास देण्यात आले आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे भारतातले पाचवे आणि महाराष्ट्रातले पहिले मुक्त विद्यापीठ आहे. विद्यापीठाचे मुख्यालय नाशिक येथे असून संपूर्ण महाराष्ट्र राज्य हे या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आहे. विद्यापीठाच्या ८ विभागीय केंद्रांच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभरातील २४०० पेक्षा अधिक विद्यार्थी सहाय्यता केंद्र जोडलेली आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) कायदा कलम 12(ब) अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य विधीमंडळ आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांनी विद्यापीठास प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी तसेच संशोधन शिक्षणक्रम राबविण्यास अनुमती दिलेली आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अनेक नामांकित राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांचे सदस्य आहे. विद्यापीठाला सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोनवेळा सन्मानित करण्यात आले आहे. तसेच नुकतीच नॅक मानांकित **'A'** श्रेणी प्राप्त झाली आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ देशातील सर्व मान्यताप्राप्त विद्यापीठांशी समकक्ष आहे. महाराष्ट्र शासन व शासनाच्या मान्यताप्राप्त असलेल्या सर्व सरकारी, निमसरकारी, खाजगी संस्था, विविध मंडळे, इत्यादींमधील नोकऱ्यांसाठी, नोकरीत बढती मिळण्याकरिता तसेच पुढील शिक्षणासाठी या विद्यापीठाच्या पदव्या इतर विद्यापीठांच्या पदव्यांप्रमाणेच समकक्ष आहेत. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाने त्यांच्या परीक्षांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी पात्र असल्याचे यापूर्वीच घोषित केले आहे. आजपर्यंत विद्यापीठाचे अनेक विद्यार्थी केंद्रीय तथा राज्य लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.

राष्ट्राच्या व राज्याच्या विकास आराखड्यांशी समन्वय साधून, आपल्या विकासविषयक गरजांना अनुरूप विविध शिक्षणक्रम उपलब्ध करून देणे हे मुक्त विद्यापीठांचे ध्येय आहे. तसेच बदलते तंत्रज्ञान व त्या अनुषंगाने बदलणाऱ्या जीवनप्रणालीशी

समायोजन साधण्याकरिता समाजाला ज्ञानात्मक आधार पुरविणारे शिक्षणक्रम विकसित करण्यावर मुक्त शिक्षणपध्दतीचा भर आहे. त्यामुळे 'आयुष्यभरासाठी शिक्षण', 'काम करता-करता शिक्षण', 'नोकरी व्यवसायाला आधारभूत ठरणारे कौशल्याधिष्ठित शिक्षण' ह्या संकल्पना प्रत्यक्षात आणून अध्ययनशील समाजाच्या जडणघडणीत विद्यापीठ सहभागी आहे.

'ज्ञानगंगा घरोघरी' विद्यापीठाचे ब्रीदवाक्य असून 'लोकविद्यापीठ' होण्याकडे वाटचाल करीत आहे. समाजाच्या तळागाळातील सर्वांपर्यंत गरजेनुसार शिक्षण पोहचविणे विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे. मुख्यालय, विभागीय केंद्रे, जिल्हा केंद्रे, अभ्यासकेंद्रे, कार्यस्थळ यांच्यामार्फत विद्यापीठाचे विविध शिक्षणक्रम ग्रामीण, शहरी तसेच आदिवासी भागांतील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. मातृभाषेतून शिक्षण उपलब्ध करून देण्याचे या विद्यापीठाचे धोरण असून 'लोकभाषेला ज्ञानभाषेचा दर्जा प्राप्त करून दिला पाहिजे' या यशवंतराव चव्हाण यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाला अनुसरून हे विद्यापीठ काम करीत आहे.

## १.०.१ मुक्त विद्यापीठाची उद्दिष्टे

१. समाजातल्या शेवटच्या स्तरापर्यंत 'ज्ञानगंगा' पोचवून तसेच शहरी, ग्रामीण व मागास भागातील कष्टकरी, गृहिणी व अन्य प्रौढांना त्यांच्या गरजा लक्षात घेऊन सर्वसाधारण पदवी शिक्षण, व्यावसायिक, तांत्रिक व इतर शिक्षण-प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे. म्हणजेच समाजातील विविध स्तरांमधील ज्ञानात्मक विषमता दूर करण्याचे माध्यम म्हणून कार्य करणे.

२. वय, कालावधी व प्रवेश पात्रतेच्या नियमांचे जोखड दूर करून शिकण्याची इच्छा असणाऱ्या सर्वांना सहजपणे शिक्षण घेता येईल अशी लवचिक व उपक्रमशील मुक्त शिक्षणपध्दती विकसित करणे.

३. पारंपरिक विद्यापीठातील शिक्षण अपूर्ण राहिलेल्या व्यक्तींना त्यांनी पूर्ण केलेल्या शैक्षणिक भागाचे मूल्य विचारात घेऊन मुक्त विद्यापीठाच्या उपलब्ध शिक्षणक्रमात (Credit Transfer System) व पुढील शिक्षणाच्या वाटा मोकळ्या करणे.

४. अनौपचारिक व निरंतर शिक्षणामार्फत, तसेच शैक्षणिक विस्तार सेवांच्या उपक्रमांतून विविध कला-कौशल्यांचा विकास करण्याकरिता गुणात्मक शिक्षण उपलब्ध करून देणे, बदलत्या तंत्रज्ञानाशी समायोजित होण्यासाठी प्रौढांना नव्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे, भारताच्या आणि विशेषत: महाराष्ट्राच्या कला-परंपरा, सांस्कृतिक संचित आणि सामाजिक प्रबोधनाचा वारसा यांचे जतन व संवर्धन करण्याकरिता तसेच राष्ट्रीय एकात्मता व व्यक्तित्वाचा एकत्र विकास साधण्याकरिता विविध शिक्षणक्रम विकसित करणे.

५. केवळ शासकीय अनुदानावर अवलंबून न राहता आपल्या प्रशासकीय खर्चाच्या बाबतीत स्वावलंबी होण्यावर भर देऊन त्याकरिता खाजगी व सामाजिक संस्थांचा वित्तीय सहभाग मिळविणे, तसेच संगणकादी आधुनिक उपकरणांचा प्रभावी उपयोग करून किफायतशीर व गुणवत्ताधिष्ठित कार्यप्रणाली विकसित करणे.

## १.१ विद्याशाखेचा परिचय

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेत मानवी मूल्यांसह मानवनिर्मित कला, भाषा, साहित्य, सर्जनशीलता, तसेच कुटुंबसंस्था, राज्यसंस्था, अर्थसंस्था इ. विविध संस्थांच्या रचना, तत्त्वज्ञान, इतिहास व परंपरांचा अभ्यास केला जातो. २१व्या शतकातील जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी बौद्धिक पूर्वतयारी करणे आणि अध्ययनशील समाजासाठी शैक्षणिक संसाधनांचा विकास करणे हे या विद्याशाखेचे ध्येय आहे. व्यक्ती विकासावर भर देणे, व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी सहाय्यभूत ठरणे व व्यक्तिला प्रगतीपथाकडे नेणे ही या विद्याशाखेतील अभ्यासक्रमांची वैशिष्ट्ये आहेत.

### १.१.१ विद्याशाखेची उद्दिष्टे

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. विद्यार्थीकेंद्री शिक्षणक्रम विकसित करणे.
२. मुक्त शिक्षण प्रणालीनुसार लवचिक अध्ययन व अध्यापन पद्धतींचा अवलंब करणे.
३. समाजातील अद्याप शिक्षण पोहोचले नाही अशा दुर्लक्षित घटकांपर्यंत शिक्षण पोहचविणे.
४. अध्ययनार्थीला मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे ज्ञानशाखेतील शिक्षणास प्रोत्साहित करणे.
५. नवज्ञानाधारित समाजनिर्मिती करणे.
६. दूरशिक्षणाद्वारे जनसामान्यांपर्यंत पोहोचून लोकविद्यापीठ घडविणे.

### १.१.२ विद्याशाखेची ठळक वैशिष्टये

१. जगभरातील विविध संस्कृती, राष्ट्र-राज्यांच्या जडणघडणीचा, परंपरांचा इतिहास इत्यादींचा प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पीएच.डी. शिक्षणक्रमांचा समावेश.
२. स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवी हक्क इत्यादी मूल्ये तसेच पर्यावरणरक्षणादी चळवळी, मानवी विकास निर्देशांक, शाश्वत विकासाची उद्दिष्ट्ये इत्यादी जागतिक कल्याणकारी संघटनांच्या कार्याचा समावेश.
३. स्त्रियांचे सबलीकरण, वंचितांच्या अस्मितेचे लढे, भाषा, धर्म, प्रदेशांच्या विविधतेतून एकतेसाठी रचलेले नमुना-दर्श यांचा अंतर्भाव.
४. जागतिकीकरण आणि स्थानिक विकासाची सांगड अशा विविध आशयसूत्रांचा अभ्यासक्रमांमध्ये समावेश.
५. ग्रंथालय व माहितीशास्त्र, वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन, गांधी विचारदर्शन, मानवी हक्क, ग्राहक संरक्षण अशा विशेष विषयांवर स्वतंत्र शिक्षणक्रम.
६. सिद्धांत आणि व्यवहार यांची सांगड घालणारे उपयोजित अभ्यासक्रम.
७. व्यक्तीच्या सर्जनशीलतेला व कल्पकतेला वाव देणारे अपारंपरिक अभ्यासक्रम.
८. व्यक्तिमत्त्व विकासआणि व्यावसायिक यशासाठी पूरक कौशल्यांना वाव देणारे अभ्यासक्रम.
९. स्वयं-अध्ययनासाठी लागणाऱ्या नावीन्यपूर्ण कौशल्यांचे शिक्षण.
१०. पायाभूत अभ्यासक्रमात विविध संकल्पनांचे स्पष्टीकरण देण्यावर भर.
११. स्वयंअध्ययन पुस्तके, स्वाध्याय, क्षेत्रीय कार्य, प्रकल्प अभ्यास, वेबमाध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शक सेवा व शैक्षणिक साहाय्य.
१२. प्रत्येक शिक्षणक्रमात आवडीप्रमाणे निवड करता येतील असे पर्याय.

### १.१.३ उपलब्ध शिक्षणक्रम

**प्रमाणपत्र शिक्षणक्रम**

- मानवी हक्क
- समंत्रक प्रशिक्षण

**पदविका शिक्षणक्रम**

- गांधी विचार दर्शन
- वृतपत्रविद्या आणि जनसंज्ञापन

**पदवी शिक्षणक्रम**

- बी. ए. (मराठी माध्यम)
- बी. ए. (उर्दू माध्यम)
- जनसंज्ञापन आणि वृतपत्रविद्या
- ग्रंथालय व माहितीशास्त्र

**पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम**

- मराठी
- हिंदी
- उर्दू
- इतिहास
- अर्थशास्त्र
- लोकप्रशासन
- ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णांत

## १.२ क्षेत्रीय प्रकल्प अभ्यासक्रम (Field Project)

पदव्युत्तर पदवी (मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास, लोकप्रशासन) शिक्षणक्रमांत 'क्षेत्रीय प्रकल्प' अभ्यासक्रमाचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाच्या दुसऱ्या सत्रात ४ श्रेयांकासाठी १०० गुणांचा ‘क्षेत्रीय प्रकल्प’ हा अनिवार्य अभ्यासक्रम आहे. याअंतर्गत विद्यार्थ्यांना आपल्या अभ्यासक्रमांशी संबंधित विषयांवर क्षेत्रीय कार्य करून ‘क्षेत्रीय प्रकल्प अहवाल’ सादर करणे अनिवार्य आहे. क्षेत्रीय प्रकल्प आणि त्याचे अहवाल लेखन कसे करावे याबाबतचे सविस्तर विवरण या पुस्तिकेत दिले आहे.

- ### क्षेत्रीय प्रकल्प

क्षेत्रीय प्रकल्पाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांतील सिद्धांत आणि संकल्पना यांची सांगड घालून संकल्पनात्मक विषयांवर प्रत्यक्ष कार्य करण्याची संधी उपलब्ध करून देणे, स्थानिक समस्यांच्या आधारे सामाजिक जीवनाचे आकलन होण्यास तसेच ज्ञान, मूल्य आणि कौशल्ये आत्मसात करण्यास सक्षम करण्याचा उद्देश आहे. यामाध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संशोधकवृत्ती आणि विश्लेषण करण्याची कौशल्ये विकसित होतील आणि ज्ञानाच्या कक्षा रुंदावून विकासात्मक दृष्टीकोन विकसित होईल. क्षेत्रीय प्रकल्प कोणत्याही सामान्य विषयापासून सुरू करता येतो. यास अभ्यासाचे प्राथमिक साधन मानले जाते. या माध्यमातून विद्यार्थ्याला स्वतःची आवड, नाविन्यपूर्ण समाधान शोधण्याची क्षमता आणि सर्जनशीलता विकसित करण्यास वाव मिळतो. क्षेत्रीय प्रकल्पातून भाषिक, सांस्कृतिक, सामाजिक, प्रशासकीय, आर्थिक प्रश्नांवर काम करताना विविध घटकांतील सहसंबंध स्पष्ट करता येतो, सामाजिक जीवनातील बदलांची प्रक्रिया समजते, सुप्त गुणांना चालना मिळते.

विद्यार्थ्यांना आपल्या भोवतालच्या वास्तव जीवनातील विविध आव्हानांवर प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळते. मानवी व्यवहार आणि वर्तनातून निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्याची कौशल्ये विकसित होण्यास मदत होते. सार्वजनिक जीवनातील विविध घटक आणि समस्या समजून घेऊन त्यावर उपाय सुचविण्याची क्षमता विकसित होण्यासाठी क्षेत्रीय प्रकल्पाचे महत्त्व आहे.

## १.२.१ क्षेत्रीय प्रकल्प अभ्यासक्रमाची उद्दिष्टे (Course Objectives)

१. अभ्यास विषयाच्या अनुषंगाने निदर्शनास येणाऱ्या सामान्य किंवा स्थानिक समस्यांची जाणीव निर्माण करणे.
२. अभ्यासक्रमातील सिद्धांत, संकल्पना यांची व्यावहारिक जीवनाशी सांगड घालण्यास सक्षम करणे.
३. तथ्य संकलन, माहितीचे विश्लेषण आणि संशोधनकरण्याची क्षमता विकसित करणे.
४. अनुभवजन्य ज्ञानाच्या आधारे व्यक्तिमत्व विकास साधण्यास मदत करणे.
५. विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सकवृत्ती विकसित करून समस्यांवर उपाययोजना सुचविण्यास सक्षम करणे.

## १.२.२ क्षेत्रीय प्रकल्प अभ्यासक्रमाची निष्पत्ती (Course Outcomes)

**क्षेत्रीय प्रकल्प पूर्ण केल्यानंतर...**

१. अभ्यास विषयाच्या अनुषंगाने निर्देशिनास आलेल्या सामान्य किंवा स्थानिक समस्यांबाबत सजगता येते.
२. संकल्पना आणि व्यावहारिक जीवन यांच्यातील सहसंबंधांची जाणीव होते
३. माहिती व आकडेवारी गोळा करण्याचे कौशल्य विकसित होते.
४. प्रत्यक्ष सहभागी होऊन प्रश्नांची सोडवणूक करताना व्यक्तिमत्व विकास होतो.
५. संस्थात्मक पातळीवरील समस्यांचे स्वरूप ओळखून उपाय सुचविण्याची क्षमता विकसित होते.

## १.२.३ क्षेत्रीय प्रकल्पासाठी सूचना

### विद्यार्थी सहाय्यता केंद्रांसाठी सूचना

- क्षेत्रीय प्रकल्पासाठी कार्यपुस्तिकेसोबत दिलेल्या विषयसूचीतील कोणत्याही एका विषयाची निवड करू शकतात. विषयाची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घ्यावी. त्याकरिता विद्यार्थ्यांद्वारे निवडलेल्या विषयांची नोंद आपल्याकडे ठेवावी आणि त्यांना संबंधित विषयाच्या समंत्रकांनी मार्गदर्शन करावे.
- सूचीमध्ये दिलेल्या विषयाव्यतिरिक्त अभ्यासक्रमासंबंधित इतर विषयाची निवड करू शकतात.
- क्षेत्रीय प्रकल्पाचे सादरीकरण विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर सत्र परीक्षेपूर्वीच करून घेणे अनिवार्य असेल.
- विद्यार्थी सहाय्यता केंद्राद्वारे विद्यार्थ्यांच्या क्षेत्रीय प्रकल्पाचे गुण विद्यापीठ संकेतस्थळावरील / परीक्षा विभागाच्या वेब पोर्टलवर निर्धारित वेळेत अपलोड करणे अनिवार्य असेल.
- **क्षेत्रीय प्रकल्पासाठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही वेगळे /स्वतंत्र/आगाऊ** /(Extra) **शुल्क घेऊ नये.**
- अंतर्गत आणि अंतिम मूल्यमापन विद्यार्थी सहाय्यता केंद्रावरच होईल. अंतिम मूल्यमापनासाठी विभागीय केंद्राद्वारे बहि:स्थ परीक्षकांची नेमणूक केली जाईल. बहि:स्थ परीक्षकांचे मानधन प्रतिदिन रु. ५००/- तसेच रु. २००/- इतका प्रवास भत्ता विद्यार्थी सहाय्यता केंद्राने अदा करावयाचे आहे.
- सत्र परीक्षेपूर्वी विद्याशाखेद्वारे दोन किंवा त्यापेक्षा अधिक विशिष्ट कायम नोंदणी क्रमांकांच्या विद्यार्थ्यांच्या क्षेत्रीय प्रकल्पांची मागणी केल्यास मा. संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री परिसर, गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - ४२२ २२२ या पत्त्यावर टपालाने पाठवणे आवश्यक असेल. त्यातील आदर्श प्रकल्प अहवाल इतर विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड करता येऊ शकतील.

## विद्यार्थ्यांसाठी सूचना

- क्षेत्रीय प्रकल्प या अभ्यासक्रमांतर्गत क्षेत्रीय प्रकल्प करणे अनिवार्य आहे.
- क्षेत्रीय प्रकल्पासाठी सोबत दिलेल्या विषयसूचीतील कोणताही एक विषय निवडावा.
- निवडलेल्या विषयाची नोंद आपल्या केंद्र समन्वयकांकडे करून त्यांनी नेमून दिलेल्या सबंधित विषयाच्या समंत्रकांचे मार्गदर्शन घेणे अपेक्षित आहे.
- क्षेत्रीय प्रकल्पासाठी निवडलेला विषय विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर नोंदवणे आवश्यक आहे. नोंदणी न करता सादर केलेला प्रकल्प मूल्यमापनासाठी स्वीकारला जाणार नाही.
- क्षेत्रीय प्रकल्प **किमान ४००० शब्दांत** असावा.
- क्षेत्रीय प्रकल्प **स्व-हस्तलिखितच** असावा.
- 'क्षेत्रीय प्रकल्प' आराखडा तयार करताना पुढील बाबी लक्षात घ्याव्यात.
    - प्रकल्प अहवालाच्या मुखपृष्ठावर विद्यार्थ्यांनी आपली संपूर्ण माहिती लिहावी. विद्यार्थ्यांचे प्रतिज्ञापत्र तसेच मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र पूर्ण भरावे आणि त्यावर स्वाक्षरी घ्यावी.
    - आवश्यकतेनुसार अतिरिक्त पृष्ठे जोडावीत. क्षेत्रीय प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार विषयासंबंधित मुद्रित माध्यमांतील छायाचित्रे / कात्रणे परिशिष्टांत अनुक्रमाने चिटकवून द्यावीत.
    - क्षेत्रीय प्रकल्पाचे सादरीकरण सत्र परीक्षेपूर्वी विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर करणे अनिवार्य आहे.
    - प्रकाशित साहित्य, माहिती, लेखांची कॉपी करु नये, असे केल्यास क्षेत्रीय प्रकल्प रद्द करण्यात येईल.
    - **क्षेत्रीय प्रकल्पासाठी विद्यापीठाकडून किंवा विद्यार्थी सहाय्यता केंद्राकडून कोणतेही वेगळे/ स्वतंत्र/ आगाऊ (Extra) शुल्क आकरण्यात येत नाही.**
    - विद्यार्थी सहाय्यता केंद्राने क्षेत्रीय प्रकल्पासाठी वेगळ्या शूल्काची मागणी केल्यास कोणतेही शुल्क अदा करु नये. आपण त्याबाबत मा. संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री परिसर, गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२ २२२ यांच्याकडे लेखी तक्रार करु शकता. आपण कोणतेही वेगळे/ स्वतंत्र/ आगाऊ (Extra) शुल्क अदा केल्यास ती सर्वस्वी आपली जबाबदारी असेल.
    - सत्र परिक्षेपूर्वी आपले क्षेत्रीय प्रकल्प विद्यापीठाकडून मागवून घेतले जाणार असल्याने आपला क्षेत्रीय प्रकल्प विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर वेळेत सादर करावा.

## १.३ क्षेत्रीय प्रकल्प मूल्यमापन पद्धती

क्षेत्रीय प्रकल्प हा अभ्यासक्रम १०० गुणांचा असून अंतर्गत व अंतिम मूल्यमापनास ५०:५० भारांश असेल. यात उत्तीर्ण होण्यासाठी एकत्रित किमान ४० गुण मिळवणे अनिवार्य असेल. सदर प्रकल्पाच्या मूल्यमापनाचे विवरण पुढीलप्रमाणे असेल.

| श्रेयांक | एकूण गुण | | अंतर्गत कार्य | | अंतिम परीक्षा | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कमाल गुण | किमान गुण | कमाल गुण | किमान गुण | कमाल गुण | किमान गुण |
| ४ | १०० | ४० | ५० | २० | ५० | २० |

## १.३.१. अंतर्गत मूल्यमापन

अंतर्गत मूल्यमापन ५० गुणांसाठी असेल. विद्यार्थ्यांद्वारे केलेल्या प्रकल्पाचे मूल्यमापन-विषय निवड, पत्रव्यवहार, ग्रंथालय भेट, संपर्क, संवाद, चर्चा, क्षेत्र-भेट, निरीक्षण, मुलाखत, सर्वेक्षण-प्रश्नावली माहिती/ तथ्य संकलन आणि विश्लेषण, अहवाल लेखन आणि निष्कर्ष याआधारे केले जाईल.

- **अंतर्गत मूल्यमापनाचे निकष**

| अ. क्र. | घटक / अंतर्गत मूल्यमापनाचे निकष | अंतर्गत मूल्यमापन | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | समस्या सूत्रण / विषय निवड / महत्त्व / पार्श्वभूमी | १० | २० |
| २. | निरीक्षण, आंतरक्रिया, संपर्क/ समन्वय, ग्रंथालय भेट | ०५ | १० |
| ३. | माहिती / तथ्य संकलन आणि विश्लेषण | १० | २० |
| ४. | अहवाल लेखन | १५ | ३० |
| ५. | निष्कर्ष / प्रत्याभरण / शिफारशी / उपयुक्तता | १० | २० |
| | **एकूण** | **५० गुण** | **१००%** |

## १.३.२ अंतिम मूल्यमापन

अंतिम मूल्यमापन ५० गुणांसाठी असेल. विद्यार्थ्यांद्वारे सादर केलेल्या क्षेत्रीय प्रकल्पाच्या अंतिम मूल्यमापन सादरीकरण (३० गुण) आणि मौखिक (२० गुण) यांचा समावेश असेल. क्षेत्रीय प्रकल्पाच्या अंतिम मूल्यमापनाचे निकष पुढीलप्रमाणे असतील.

- **अंतिम मूल्यमापनाचे निकष**

| अ. क्र. | घटक / अंतिम मूल्यमापनाचे निकष | अंतिम मूल्यमापन | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | **सादरीकरण**<br>निर्धारित वेळेत अहवाल सादरीकरण, क्षेत्रीय कार्याची लेखी नोंद / तपशील, लेखनशैली, संदर्भ साहित्याचा उल्लेख, संदर्भित छायाचित्रांचा सुयोग्य समावेश, मौखिक सादरीकरण (आत्मविश्वास, देहबोली, भाषिक कौशल्ये) इ. | ३० | ६० |
| २. | **मौखिक परीक्षा**<br>(विषयज्ञान - समस्या सूत्रण / विषय निवड / महत्त्व / पार्श्वभूमी आंतरक्रिया/ संपर्क/समन्वय / पत्रव्यवहार, ग्रंथालय भेट/माहिती/ तथ्य संकलन आणि विश्लेषण, अहवाललेखन, निष्कर्ष / प्रत्याभरण / शिफारशी / उपयुक्तता इत्यादींच्या आधारे प्रश्नोत्तरे) | २० | ४० |
| | **एकूण** | **५० गुण** | **१००%** |

## अधिक माहितीसाठी

क्षेत्रीय प्रकल्पाबाबत काही शंका असल्यास आपल्या विद्यार्थी सहाय्यता केंद्राच्या केंद्र समन्वयक, संबंधित विषयाचे मार्गदर्शक किंवा विद्याशाखेतील शिक्षणक्रम संयोजक यांच्याशी संपर्क साधावा.

## पत्रव्यवहारासाठी पत्ता


मा. संचालक<br>
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा,<br>
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,<br>
ज्ञानगंगोत्री परिसर, गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक – ४२२ २२२<br>
**दूरध्वनी : ०२५३-२२३१४७५**<br>
**ईमेल :** director.shu@ycmou.ac.in